शिडीच्या हादऱ्याने टॉवरचे खांब थोडेसे कंप पावले. खालच्या आवाजाने वैजूला जराशी जाग आली. पहाटेनंतर गार हवेत तिला जराशी झोप लागली होती. रात्रभराच्या अवघडून बसण्यानंतर अताशा तिला त्याची सवय होऊन चांगला डोळा लागला होता. अचानक बसलेल्या हादऱ्याने आता तिला अर्धवट जाग आली होती. लागलेली दुर्मिळ झोप मोडल्याने नाराजीने तिच्या तोंडातून अगदी सहजच उद्‌गार निघाले,

“. . . . . . च्यायला! भेंडी ! चांगली झोप लागली होती तर. . . . . . .” जांभई देत तिने खाली पाहिले आणि तिची झोप कुठल्याकुठे पळाली. शिडी लावून दोन महिला पोलीस वर चढतायत हे तिने पाहिले. खालचा प्रत्येक अन् प्रत्येक माणूस आपल्याकडेच टक लावून पाहतोय या विचारानेच तिच्या पोटात एक गोळा उठला. ‘आता काय?’ या विचारानेच तिला पुरते पछाडले. काहीही झालं तरी यांच्या हाती नाही लागायचं एवढंच मनाशी पक्क ठरवून तिने मदतीसाठी इकडे तिकडे पाहिले.

सगळी झाडंझुडूपं आता ठेंगणी राहिली होती. काल रात्रीपासून मस्त वाटणारा तोच परिसर जणु तिला गिळायला लागल्याचा भास झाला. टॉवरपासून खाली सांडलेला काळाकभिन्न महाकाय रस्ता, रस्त्याच्या अगदी कडेला लावलेली एम.एस.ई.बी. ची व्हॅन, शिडी, सगळे कर्मचारी, पोलीसांचा कंपू आणि बाकी सारे उजाड माळरान. . . . . . . . . . . . . . एका कटाक्षातच सारं काही स्पष्ट नजरेस भरलं. ‘पुन्हा आपल्याला अपमानस्पद कैद होणार’ हेही तितकंच स्पष्ट दिसत होतं. पण का कोण जाणे, तरीही कुठेतरी एखादं अस्पष्टसं सुटकेचं भाकीत तिला खुणावत होतं. मनात एकच जिद्द पेटली. ‘काहीही करून मी इथून सुटणार’ एवढा एकच विचार तिनं मनाशी घोळवला. पण करावं काय ?

तिची अस्वस्थता, चुळबूळ शिडीवरून चढून येणाऱ्या एका महिला पोलीसाच्या नजरेत भरली. तसं तिनं ओरडून खाली सांगितलं.

“मॅडम, पोरगी शुद्धीवर आलीये.”

तिच्या ओरडण्याने वैजूवर खूपच दडपण आलं.

जवळपास पाऊण अंतर चढून आलेल्या महिला पोलीसांना आणि कर्मचाऱ्यांना आता प्रचंड थकवा जाणवू लागला. खालच्या सर्वांचा मात्र उत्साह वाढला होता. इकडे वैजूलाही काय करावे ते सुचेना. अजून वर चढायलाही कुठे जागा नव्हती. कुठूनतरी एखादे विमान यावे आणि आपल्याला इथून अलगद उचलून घेऊन जावे, अशी तिची मनोमन इच्छा होती.

“वैजू, खाली उतर. आम्ही तुला सुरक्षित नेऊ.” घामाने डबडबलेल्या एका महिला पोलीसाने वैजूला हमी दिली.



एकदम बिनधास्त

“एऽऽ आणखी वर येऊ नकोस हं, नाहीतर ढकलूनच देईन खाली.” अजिबात न घाबरल्याचा आव आणत वैजूने तिलाच धमकावले. खरं तर स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याच्या जीवावर बेतेल असं काही करणं तिच्या स्वभावातच नव्हतं पण कोण जाणे, आता तिच्या जीवावरच बेतल्याने तिला असं बोलायला भाग पाडलं असावं.

कर्मचाऱ्यांच्या मदतीने दोघी तरूण महिला पोलीस चढून वर येताना पाहून वैजूला आता खरोखरीच घाम फुटला. काय करावं काही सुचेना. “नाही वैजू, असं घाबरून कसं चालेल. क्षणात फासे बदलवू शकशील, जर युक्तीने योग्य वागशील !” वैजूने जणु तिचा यशोमंत्रच म्हटला. स्वतःला धीर देत तिने क्षण दोन क्षण गच्च डोळे मिटून घेतले. गरगरणारे डोके हातांनी घट्ट दाबले. ‘मी यातून नक्की सुटेनच.’ आतला हाच आवाज तिला साद देत होता.

डोळे उघडून पाहिले तर काय ती बसलेल्या दांडीपासून हातभर अंतरावर दोन्ही पोलीस पोहोचल्या होत्या. मोठ्या शिताफीने तिने त्या टॉवरच्या चौकोनी दांड्या लक्षात घेऊन झट्कन बाजू बदलली. आणखी एक उडी मारून ती वर चढून आलेल्या महिला पोलीसाच्या बरोब्बर विरूद्ध दिशेला, टॉवरच्या समोरासमोर दांडीवर उभी राहिली. जणु गड जिंकल्याच्या आनंदात बेभान झालेल्या त्या महिला पोलीसाने तिला दरडावले,

“पळून पळून तरी कुठे पळशील गं? सापडलीस की नाही ? आता चल गपगुमान खाली.”

“एऽऽऽ ज्जा. नाही येत.” बेडरपणे वैजूने तिला सांगून टाकले.

“नाही येऽऽत? अशी कश्शी नाही येत ? आता इथून जाशील कुठे ?” फुशारकीने ती पोलीस म्हणाली.

वैजूने पुन्हा एकवार खाली पाहिले. वर चाललेल्या नाट्यमय ॲक्शनपटाकडे सर्वजण तितक्याच उत्सुकतेने पहात होते. सारं सारं आयुष्य मनसोक्त जगलेल्या तिला अशी आगतिक कैद मान्यच नव्हती. अखेर तोही शेवटचा क्षण आला. कुठूनतरी मदत मिळावी या अपेक्षेने डोळे भरून तिने आकाशाकडे पाहिले आणि दुसऱ्याच क्षणी रस्त्यावरून धावणाऱ्या ट्रकवर तिने बिनधोकपणे उडी मारली.

From the Novellete ‘Ekdum Bindhast’

written by Prajakta Gavhane ©

Book available : https://www.amazon.in/dp/B07YN8PK9J